| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |


**प्रेसनोट क्रमांक :- २७५** **दिनांक :- ०१/१०/२०२१**

## चार चाकी वाहने व गाडीच्या काचा फोडून कारटेप चोरी करणारे आरोपीतांना अटक- गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमिरा यांची कामगिरी.

दिनांक १३/०७/२०२१ रोजी ०२:५१ वाजता भाईंदर पुर्व कॅबीन क्रॉस रोड येथून फिर्यादी श्री विजयकुमार लक्ष्मीनारायण गुप्ता, रा.भाईंदर पुर्व यांची कार क्र एम एच ०४ के आर १६२३ व साक्षीदार कमलेश भानाभाई पटेल यांची कार क्र एम एच ०४ के आर ११४८ च्या काचा फोडून व नुकसान करून त्यामधील २८,०००/- रुपये किंमतीचे दोन कार टेप कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केलेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुरनं ४७३/२०२१ भादंवि ३७९, ४२७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटिकरण कक्ष-१, यांनी घटनास्थळावरुन तांत्रिक पुरावे व मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे सदरचे गुन्हे करणारा इसम हा रुपेश वालेतीन डिमेलो रा. वसई असल्याची माहिती मिळाली होती. त्याअनुषंगाने त्याचेबाबत सविस्तर माहिती काढून त्यास दिनांक ०२/०९/२०२१ रोजी वसई येथून ताब्यात घेता त्याचे कब्जात चोरीची अल्टो कार, पेनड्राईव्ह, इग्निशन स्विच, वाहनाच्या चाव्या, बँकेचे चेक, पासबुक, स्क्रू ड्रायवर असे मिळून आले. सदर आरोपीस अटक करुन त्याचेकडे सखोल विचारपूस केली असता त्याने खालीलप्रमाणे गुन्हे केल्याची सांगितल व गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. कलम | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| १ | नयानगर | ३९५/२०२१ भादंवि कलम ३७९, ४२७ | ३०,०००/ रु. किं. चा सोनी कपंनीचा कारटेप |
| २ | वालीव | ४२९/२०२१ भादंवि कलम ३७९ | ३५,०००/ रु. किं. चा बजाज कंपनीचा प्लटीना मोटार सायकल |
| ३ | वर्तकनगर | २६०/२०२१ भादंवि कलम ३७९ | ५०,०००/ रु. किं. ची अल्टो कार |
| ४ | नौपाडा | २२९/२०२१ भादंवि कलम ३७९ | ४५,०००/ रु. किं. चा बजाज कंपनीचा पल्सर मोटार सायकल |
| ५ | एम.एफ.सी. कल्याण | ५२४/२०२१ भादंवि कलम ३७९,४२७ | २००/ रु. किं. चा पेन ड्राईव्ह |
| ६ | रबाळे, नवी मुंबई | ३५१/२०२१ भादंवि कलम ३७९, ४२७ | २००/ रु. किं. चा पेन ड्राईव्ह |

वरीलप्रमाणे चोरीच्या गुन्हयातील अटक आरोपीतांकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच दिनांक २९/०७/२०२१ रोजी दुपारी १४:२० वाजताच्या सुमारास फिर्यादी दिलीप इस्माईल लोंढे वय ६०, रा. मिरारोड पुर्व यांनी पार्क करुन ठेवलेल्या कारची कोणीतरी अज्ञात इसमाने डावे बाजुकडील पुढची काच फोडून डाव्या सिटवरील प्लास्टीकच्या पिशवीत गुंडाळून ठेवलेले एकुण १,००,०००/- रुपये रोख रक्कम चोरुन नेल्याने काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुरनं ५३५/२०२१ भादंवि ३७९, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदाराचे मार्फतीने मिळालेल्या बातमीच्या आधारे इसम नामे १) सॅम्युअल हॅरेल परेरा वय ५२ रा. कासारवडवली, ठाणे व २) सुभाष नागेश गायकवाड वय ३८ रा. दौंड जि. पुणे अशांना दिनांक २४/०९/२०२१ रोजी मिरारोड पुर्व कनाकिया रोड येथून ताब्यात घेवून सदर गुन्हयाचे बाबतीत विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करून सदर गुन्हयात चोरीस केलेल्या रकमेपैकी ५०,०००/- रुपये व गुन्हयात वापरेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अविराज कुराडे, सपोनि. किशोर टोपले, पोउपनि. हितेंद्र विचारे, पुष्पराज सुर्वे, सहा.पोउपनी. महादेव पाठक, राजु तांबे, पोहवा संदिप शिंदे, किशोर वाडिले, अर्जुन जाधव, संजय शिंदे, अविनाश गरजे, पोना पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रशांत विसपुते, पोशि विकास राजपुत सर्व नेमणुक गुन्हे प्रकटिकरण शाखा १ काशिमिरा यांनी पार पाडली आहे.

---००---